
ePaper
बारावीची परीक्षा आजपासून; गैरप्रकार रोखण्यासाठी व्यापक उपाययोजना!

| वर्ष - 7 | अंक - 275 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- फलटणचा पाणी चोर कोण?
- मराठा आरक्षण विधेयक मंजूर!
- 40 आमदार भाजपच्या वाटेवार?
- बुमराह चौथ्या सामन्यात संघाबाहेर

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 21 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पिंपरी-चिंचवडकरांच्या हिताचा अर्थसंकल्प

# ना करवाढ...ना दरवाढ!

### » प्रशासक शेखर सिंहांचे 'गिफ्ट' : तब्बल 8 हजार 676 कोटींच्या अर्थसंकल्पाला मान्यता

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा मूळ ५ हजार ८४१ कोटी ९६ लाख रूपये आणि केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत योजनांसह ८ हजार ६७६ कोटी ८० लाख रूपयांचा अर्थसंकल्प महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीला आज (दि.२०) सादर केला. आगामी लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणतीही करवाढ, दरवाढ करण्यात आलेली नाही.**





या विशेष सभेमध्ये महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना अर्थसंकल्प सादर केला. प्रशासकांनी अर्थसंकल्पाला तात्काळ मान्यता दिली. महापालिकेचा हा ४२ वा अर्थसंकल्प आहे. तर, आयुक्त सिंह यांचा दुसरा अर्थसंकल्प आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप उपस्थित होते. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात र.रु. ५२९७ कोटी (शिल्लकेसह) इतकी रक्कम जमा होईल हे अपेक्षित धरुन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक मा. स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेपुढे सादर केले होते. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात र.रु. ५८४१ कोटी (आरंभिच्या शिल्लकेसह) उत्पन्न अपेक्षित आहे. व त्यात प्रत्यक्षात खर्च र.रु. ५८३२ कोटी होईल व मार्च २०२५ अखेर र.रु. ९ कोटी इतकी शिल्लक राहील.

### रस्ते विकसित...

पिंपरी चिंचवड शहरातील सुमारे ६१ किलोमिटर लांबीचे रस्ते विकसित करण्यात येणार आहेत. त्यात वाकड, पुनावळे, ताथवडे, पिंपळे सौदागर, चिखली, जाधववाडी, बोहाडेवाडी, मोशी, चऱ्होली, तळवडे, दिघी, डुडुळगाव, वडमुखवाडी, कुदळवाडी या भागातील रस्ते विकसित करणेचे नियोजन आहे. सार्वजनिक खाजगी


### भागीदारी प्रकल्प..

चिंचवड येथे सिटी सेंटर, मोशी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारणे, नेहरूनगर येथील आण्णासाहेब मगर स्टेडियम विकसित करण्यात येणार आहे. पुल उभारणी... मुळा नदीवर सांगवी – बोपोडी येथे पुल उभारणी, पिंपरी येथील डेअरी फार्म येथे रेल्वे मार्गावर उड्डाणपूल बांधणे, सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे सब वे बांधण्यात येणार आहे. मामुर्डी सांगवडे येथे पवना नदीवर पुल उभारण्यात येणार आहे.


### मोठ्या इमारती...

मोशी येथे ७०० बेडचे सुसज्ज हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे. आकुर्डी गावठाण येथे वारकरी भवन उभारण्याचे नियोजन केले आहे. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर समोर पिंपरी चिंचवड महापालिकेची नवीन मुख्य प्रशासकीय इमारत उभारण्यात येत आहे.

### जमा रखमेचा आलेख




### खर्च रखमेचा आलेख




### अर्थसंकल्पाची वैशिष्ट्ये..!

- » महापालिकेच्या विकास कामासाठी १८६३ कोटी तरतूद
- » आठ क्षेत्रीय कार्यालयासाठी १९० कोटी
- » स्थापत्य विशेष योजनांसाठी १०३१ कोटी ७९ लाख
- » शहरी गरिबांसाठी १८९८ कोटी
- » महिलांच्या विविध योजनांसाठी ६१ कोटी ५८ लाख
- » दिव्यांग कल्याणकारी योजना ६५ कोटी २१ लाख
- » पाणीपुरवठा २६९ कोटी ८९ लाख
- » पीएमपीएमएलसाठी २६९ कोटी ८९ लाख
- » भूसंपादनकरिता १०० कोटी
- » स्मार्ट सिटीसाठी ५० कोटी रुपये तरतूद.

# फलटणचा पाणी चोर कोण?

## हिंमत असेल तर नाव सांगा, सुळेंचं फडणवीसांना खुलं आव्हान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एक महिन्यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फलटणला गेले होते. त्यावेळी त्यांनी एक आरोप केला होता. देवेंद्र फडणवीस म्हणत होते की, या भागात पाणी चोर आहे. या पाणी चोरीवर मी बंदी आणणार आहे. 23 वर्षे पाणी चोरी चालली. आता ही चोरी मी बंद करणार आहे. मी लोकप्रतिनिधी आणि महिला म्हणून जाहिर प्रश्न विचारते की, तुम्ही फलटणमध्ये म्हणालात की,. 23 वर्ष येथे पाण्याची चोरी होते. कोणत्या पाण्याची चोरी होते.**



कोण करतय. गेल्या साडेसहा वर्षात चोरी होत होती. मात्र, असं काय झालं की, 23 वर्षांची चोरी आठवली. तुमच्यात हिंमत असेल तर नाव घेऊन बोला आणि कोठे पाणी चोरी होत आहे, हेही जाहिर करा", असं खुलं आव्हान सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. पुरंदर तालुक्यात शरद पवार गटाचा कार्यकर्ता मेळावा पार पडला. यावेळी खासदार सुप्रिया सुळे (Supriya Sule) बोलत होत्या. सुप्रिया सुळे म्हणाल्या, गुंजवडीचा पाण्याचा तुम्ही उल्लेख केला. एक महिन्यापूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस फलटणला गेले होते. त्यावेळी त्यांनी एक आरोप केला होता. तो आरोप जास्त चर्चिला गेला नाही. फक्त वर्तमान पत्रात एकदिवस आला. चॅनल्सवरही एकदा दिवस आला असेल. देवेंद्र फडणवीस म्हणत होते की, या भागात पाणी चोर आहे. या पाणी चोरीवर मी बंदी आणणार आहे. 23 वर्षे पाणी चोरी चालली. आता ही चोरी मी बंद करणार आहे. 23 वर्षे एक माणूस चोरी करतोय. तुम्ही या आधी या राज्याचे मुख्यमंत्री होता. गृहमंत्रीही राहिलेले आहात. मग ते पाच वर्ष काय डोळे झाकून बसले होतात का? असा सवाल शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीसांना केला आहे.

देवेंद्र फडणवीसांचं कस आहे खडा टाकायचा आणि पळून जायच, अशी टीकाही सुळे यांनी केली. यावेळी देवेंद्र फडणवीसांचा आण्णाजी पंत म्हणून सुळेंनी उल्लेख केलाय. मी रोज त्यांच्यावर हल्ला चढवते. मात्र, आता त्यांच्याकडून काहीच टीका होत नाहीत. त्यांना माझा वाईटपणा घ्यायचा नाही ते दुसऱ्यांना बोलायला लावतात. मी ठरवलंय महाराष्ट्रात कोणाशी लढणार नाही. माझी महाराष्ट्रात कोणाशी लढाई नाही. माझी लढाई दिल्लीशी आहे. मेरिटवर आहे त्याच्याशी लढायच. इथ लढण्यात पॉईंट नाही. कारण स्क्रिप्ट तेच लिहित आहे. अदृश्य शक्तीशी लढूयात. प्रश्नाच्या मुळावर जाव लागत, असेही सुळे यांनी यावेळी बोलताना नमूद केले. फलटण तालुक्याला 23 वर्षांनी हक्काचं पाणी मिळतंय, अनेक प्रकारच्या चोऱ्या पाहिल्या, पण पाण्याची चोरी पाहिली नव्हती. मी राज्याचा गृहमंत्री असल्यानं चोरी केलेल्याला पकडण्याचं काम माझ्या खात्याचं आहे, त्याला आम्ही पकडूच. फलटण तालुक्याचं पाणी वळवून आपल्या मतदारसंघात नेल्याचा आरोप पश्चिम महाराष्ट्राच्या एका मोठ्या नेत्यावर नेहमी होतो. त्यालाच अनुसरून फडणवीसांनी ही बोचरी टीका केली होती उपमुख्यमंत्रीभी देवेंद्र फड़णवीस (devendra fadnavis) यांनी आज सातारा जिल्ह्यातील फलटणमध्ये मोठं वक्तव्य केलं. फलटण तालुक्याला 23 वर्षांनी) हक्काचं पाणी मिळतंय, अनेक प्रकारच्या चोऱ्या पाहिल्या, पण पाण्याची चोरी पाहिली नव्हती, असं फडणवीस म्हणाले. मी राज्याचा गृहमंत्री असल्यानं चोरी केलेल्या पकडण्याचं काम माझ्या खात्याचं आहे, त्याला आम्ही पकडूच, असंही ते पुढे म्हणाले.

### पैशाची चणचण भासणार नाही

23 वर्षानंतर या तालुक्याच्या हक्काचे पाणी या तालुक्याला प्राप्त होत आहे. नेहमी लोकं उन्हात आणि नेते सावलीत असतात पण आज नेते आणि लोकं दोन्ही उन्हात आहेत. ज्याला दुष्काळी म्हटले त्याचा डाग मिटण्याचे काम करणार आहोत, आज हक्काचे पाणी मिळणार आहे. आज फलटणमध्ये रामायणाचा नवा अध्याय सुरू करत आहोत. नरेंद्र मोदींच्या राज्यात नवीन अध्याय सुरू होतो आहे. येत्या काळात नवीन भारत आणि महाराष्ट्र उभा राहणार आहे. अनेक प्रकारच्या चोऱ्या ऐकल्या होत्या पण पाण्याची चोरी पाहायला मिळाली नाही. गृहमंत्री मीच आहे जो कुणी चोरली त्याला दंड करण्याची जबाबदारी आमची आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. गेल्या 13 महिन्यात आपण 8 योजनांना मान्यता दिली.

# शहर बनतंय ड्रग्स कॅपिटल; 1100 कोटींचं मेफेड्रॉन जप्त

## तरुणांना 'किक' बसवणारं मेफेड्रॉन नेमकं आहे तरी काय?

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पुण्यात तब्बल 1100 कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. प्रकरणी आतापर्यंत तीन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून 650 किलो पेक्षा अधिक वजनाचे मेफेड्रॉन म्हणजेच एमडी सापडले आहे.**

या संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे फक्त देशातच नसून इतर देशात देखील पोहोचलेले आहे याचा सखोल तपास सुरू आहे मात्र शिक्षणाच्या माहेर घरात एवढे किमतीचे ड्रग्स कोण आणतयं हा प्रश्न या निमित्ताने उपस्थितीत होऊ लागला आहे.पुणे पोलिसांनी अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या गुंडांसह तिघांना अटक केल्यानंतर सोमवारी रात्री उशीरा विश्रांतवाडीतील मिठाच्या गोदमात छापा टाकून तसचं कुरकुंभ मधून एकूण 1100 कोटी रुपयांपेक्षा आधिक मेफेड्रोन म्हणजेच एम डी जप्त केलं आहे. वैभव उर्फ पिंट्या भारत माने, अजय करोसिया आणि हैदर शेख अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. यातील हैदरने पुण्यातील



विश्रांतवाडी भैरावनगर या परिसरात एका गोदामात मिठाच्या पोत्यात मेफेड्रोन लपविले होते. पोलिसांनी 100 ते 200 पोत्यांची तपासणी केली असता हैदरने मिठाच्या पोत्यात लपवलेले 50 किलो पेक्षा मेफेड्रोन मिळून आले. कोणाला संशय येणार नाही अशा लोकवस्तीत हैदर ने हे गोदाम भाड्याने घेतलं होतं. ऑक्टोबर पासून हैदर याठिकाणी मिठाच्या पाकिटात ड्रग्स लपवून ठेवत असे.पुण्याच्या पाठोपाठ कुरकुंभ एमआयडीसी येथील एका कारखान्यातून 550 किलो एम डीचा साठा जप्त करण्यात आला असून एकूण 650 किलो एम डी ज्याची किंमत 1100 कोटी रुपये एवढा मुद्देमाल पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने जप्त केला आहे. पुण्यात जप्त केलेल्या ड्रग्स प्रकरणातील आरोपी हैदर शेख याला नायजेरीयन नागरिकाने एम डी ड्रग्स दिले होते. या "प्रीमियम" एम डी ड्रग्स ची किंमत कोट्यवधी रुपयांपर्यंत आहे. अंतराष्ट्रीय बाजारात 500 ग्रॅम एम डी ची किंमत तब्बल 1 कोटी रुपये इतकी आहे. आता या प्रकरणात अंतराष्ट्रीय धागेदोरे नेमके कुठले आहेत आणि नेमके हे ड्रग्स कुठून येतं होते आणि कोणाला याची विक्री केली जात होती याचा तपास सुरू असून राज्यातील विविध भागात पथकं रवाना करण्यात आली असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज दिली.

### नेमकं हे एम डी ड्रग्स आहे तरी काय?

शाळकरी आणि कॉलेजच्या मुला-मुलींमध्ये 'म्यॅव म्यॅव' आणि 'एम-कॅट' अशा कोड भाषेत प्रसिद्ध असलेले ड्रग्स म्हणजे एम डी यालाच मेफेड्रॉन असं म्हणतात. हे अमली पदार्थांचे सेवन अनेक वेळा युवा वर्गात असलेले तरुण तरुणी करताना आढळून आलेले आहेत. अवघे एक चिमूट एम डी तुमच्या शरीरात घेतलं तर तुम्हाला नशेची झिंग चढते ज्याला आजची पिढी "किक" म्हणते. अशा अमली पदार्थावर सरकारने बंदी घातली.

# 'ऑल द बेस्ट' इयत्ता 12 वी!

## आजपासून परीक्षा : शहरात 21 हजार 500 परिक्षार्थी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा बुधवार (ता. २१) पासून सुरू होत आहे. सकाळी अकरा ते दोन या वेळेत इंग्रजी विषयाचा पहिला पेपर आहे. यंदा पिंपरी चिंचवड शहरातून २१ हजार ५०० परीक्षार्थी आहेत. यासाठी ३३ केंद्रांवर बोर्डाकडून तयारी पूर्ण झाली असल्याचे केंद्र चालकांकडून सांगण्यात आले. ही परीक्षा १९ मार्चपर्यंत आहे. परीक्षार्थींनी पेपरच्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रात उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासन अधिकारी संजय नाईकडे यांनी केले आहे.**

पिंपरी चिंचवड शहरासाठी दोन कस्टडी केंद्र दिले आहेत. श्री म्हाळसाकांत माध्यमिक विद्यालय कस्टडीअंतर्गत १३ उपकेंद्र तर डॉ. डी. वाय. पाटील आर्ट, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय कस्टडीमध्ये २० उपकेंद्र आहे.

दरम्यान, उद्यापासून मुख्य परीक्षेला सुरवात होत असल्याने सर्व परीक्षा केंद्र सज्ज झाले आहेत. परीक्षेच्या आदल्या दिवशी दुपारनंतर परीक्षा केंद्रांवर बैठक क्रमांक लिहिण्याचे काम सुरू होते. प्रत्येक वर्गखोल्यांवर क्रमांक टाकले. परीक्षेसंबंधी माहितीपर फलकलेखन केले.




### कॉपीमुक्त अभियान

**कॉपीमुक्त अभियानासाठी परीक्षा मंडळाने पिंपरी विभागासाठी एकूण तीन भरारी पथके नेमली आहेत. परीक्षा केंद्रांवर शांततेत प्रवेश करण्याच्या सूचना भरारी पथकांना देण्यात आल्या असून, कॉपीमुक्त अभियानास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.**

### बैठक व्यवस्थेबाबत आवाहन

बारावी परीक्षेची बैठक व्यवस्था बोर्डाकडून दोन दिवसापूर्वी जाहीर केली आहे. संबंधित महाविद्यालयात याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली जात आहेच. शिवाय, प्रत्येक विषयानुसार केंद्र कार्यरत आहेत. यावर्षी परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे विद्यार्थ्यांना वाढवून देण्यात आली आहेत. परीक्षा केंद्राजवळील १०० मीटरवर झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्याबाबत सूचना केल्या आहेत. विद्यार्थी कॉपी करताना पकडला गेल्यास त्यावर फौजदारी गुन्हा देखील दाखल होऊ शकतो. प्रत्येक भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. संबंधित केंद्रप्रमुखांशी संपर्क साधावा, असे आवाहन केंद्रचालकांनी केले आहे.

---

# विद्यार्थी यशस्वी झाल्यास शिक्षकाच्या जीवनाचे सार्थक!

## शेखर काटे यांच्या भावना: स्वामी विवेकानंद विद्यामंदिरात कार्यक्रम

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्या प्रमाणे कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देऊन त्यापासून सुंदर मंडके घडवतो. एखादा शिल्पकार ज्या प्रमाणे ओबड धोबड दगडापासून सुंदर शिल्प घडवतो... त्याच प्रमाणे प्रत्येक शिक्षक आपला विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्न करीत असतो... विद्यार्थी यशस्वी झाला, तर शिक्षकाला आपल्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. विद्यार्थी मित्रांनो, आजच्या स्पर्धेच्या युगात दहावी हा यशाच्या दिशेने मार्गक्रमण करणारा पहिला टप्पा मानला जातो. तर बारावी हा आपल्या जीवनाची दिशा ठरवणारा महत्त्वाचा टप्पा आहे, अशा भावना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेखर काटे यांनी व्यक्त केल्या.**

जनता शिक्षण संस्था, पुणे सचालित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व डी.टी.पाटील कनिष्ठ महाविद्यालय, दापोडी येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेखर काटे बोलत होते. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेखर काटे म्हणाले की, गेले वर्षभर आपण मनापासून मेहनत केली. अभ्यास केला. त्याचे चांगले फळ निश्चितपणे मिळणार आहे. पण, गुणात्मक यशासह आपल्याला एक व्यक्ती म्हणून घडवण्यासाठी जे मंदिर आहे. त्याचे नाव शाळा आहे. ही शाळा-महाविद्यालय त्या अर्थाने आपले दुसरे कुटुंब म्हटले तर वावगे ठरणार नाही. काही वर्षापूर्वी मीसुद्धा असाच तुमच्या सारखा निरोप समारंभासाठी पुढे बसलेला एक विद्यार्थी होतो. त्यामुळे तुमच्या मनात निरोपाच्या क्षणामुळे जी अस्वस्थता आहे, ती मी जाणतो किंवा अनुभवतो.





### माणूस आयुष्यभर विद्यार्थी...

खरं तर माणूस आयुष्यभर विद्यार्थी असतो. पण, दहावी-बारावीपर्यंत जे वर्गमित्र, शिक्षण असतात... त्यांच्या सानिध्यात जे दहा-बारा वर्षांचा काळ आपण एकत्र वाढलेलो असतो... ते अक्षरश: मंतरलेले दिवस असतात. असे सोनेरी क्षणांनी मंतरलेले दिवस आणि आठवणी घेवून आज आपण यशाच्या पुढील टप्प्यावर वाटचाल करणार आहोत. आई-वडील आपल्यासोबत असतीलच... त्याच सोबत नवे मित्र आणि नवे मार्गदर्शक शिक्षक असणारच आहेत. पण, आतापर्यंत ज्यांनी आपल्याला संस्कारांची शिदोरी दिली... त्या शिक्षकांच्या संस्कारांचे चीज करण्याची जबाबदारी तुमच्यावर आली आहे. मला खात्री आहे, ही जबाबदारी आपण सक्षमपणे सांभाळणार आहेत, असा विश्वासही शेखर काटे यांनी व्यक्त केला.



## भूमिका

**न्यायपालिकेने सरकारशी सूत जुळवल्याचे लोकांना वाटावे अशा सुरात हल्ली विरोधी पक्ष टीका करतात, त्या पार्श्वभूमीवर निवडणूक रोखे रद्द करणारा निकाल आला. पण राजकीय निधी-संकलनासाठी निकोप, सर्वसमावेशक, पारदर्शक वातावरण तयार करण्याच्या गरजेकडे न्यायालयाने दुर्लक्षच केले असे म्हणावे लागेल, म्हणून या निकालाला आव्हान देऊन निवडणूक रोख्यांबद्दलचे कथानकही पुन्हा लिहावेच लागेल...**

# निवडणूक रोख्यांकडे दुर्लक्ष चालणार नाही



पारदर्शिता, पारदर्शक कारभार आणि उत्तरदायित्व यांची राजकारणाला कधी नव्हे इतकी गरज असताना आणि ती मान्यही होत असतानाच्या आजच्या काळात, राजकीय निधी-संकलनाला पारदर्शक आणि उत्तरदायी रूप देऊ पाहणाऱ्या 'निवडणूक रोखे' योजनेला सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच बेकायदा ठरवले असून ती योजना रद्द करण्याचा आदेश निकालात दिला आहे. हा निकाल निवडणूक रोख्यांच्या योजनेला हा जबर धक्का देणारा तर आहेच, पण त्याहीपेक्षा भारतातील राजकारणाची आर्थिक बाजू स्वच्छच असावी यासाठी गेल्या अनेक वर्षांत साधल्या गेलेल्या प्रगतीचे औचित्य न जाणताच दिलेल्या या निर्णयामुळे भारतीय राजकारणाचेही नुकसान ठरलेले आहे. राजकीय निधी-संकलनाच्या क्षेत्रात 'न भूतो...' अशी पारदर्शकता निवडणूक रोख्यांद्वारे प्रस्थापित करणे, हे खरोखर एक क्रांतिकारी पाऊल होते. राजकीय पक्षांनी सर्व निधी बँकांच्या औपचारिक व्यवस्थेचे सोपस्कार पार पाडूनच म्हणजे अधिकृतपणेच स्वीकारावा, अशी खात्रीशीर व्यवस्था त्यातून उभारली गेली होती आणि यामुळे अर्थातच, राजकारणात बोकाळलेला काळा पैसा निपटून काढण्यासाठी सरकारने कंबर कसून धाडसी पाऊल उचलले आहे, हेदेखील स्पष्ट होत होते. राजकारणाच्या क्षेत्रात वापरला जाणारा प्रत्येक रुपया वैध मार्गानेच यावा आणि राजकारणासाठी पैशाचा विनियोग कुठून कुठे झाला याचा काहीएक माग ठेवता यावा याची हमी प्रत्येक देशवासीयाला देण्यासाठीच तर हा पुढाकार सरकारने घेतलेला होता. होय, निवडणूक रोख्यांच्या योजनेत देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्याची तरतूद ही वादाचा एक मुद्दा ठरली होती हे मान्य, परंतु मुळात ती तरतूद का आवश्यक ठरते आहे हे तरी समजून घ्यायला हवे. एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाला निधी दिल्याच्या कारणावरून, तो देणाऱ्याला इतर पक्षांनी लक्ष्य करू नये, त्रास देऊ नये, त्याची ससेहोलपट करू नये, असा- देणाऱ्यांना संरक्षित करण्याचा-हेतू यामागे होता. आपल्या पसंतीनुसार राजकीय तत्त्वांना/ मोहिमांना अथवा पक्षाला पाठिंबा देण्याचे भयमुक्त असे स्वातंत्र्य प्रत्येकाला असलेच पाहिजे, ही कोणत्याही लोकशाही समाजाची मूलभूत पूर्वअट यामुळे परिपूर्त होत होती. वास्तविक, निवडणूक रोख्यांमधील या गोपनीयतेमुळेच तर राजकीय निधी-संकलनासाठी एक निकोप, अधिक सर्वसमावेशक असे वातावरण तयार होण्यात मदत होत होती. मात्र या महत्त्वाच्या गुणांकडे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने दुर्लक्ष केल्याचे म्हणावे लागते. या निवडणूक रोख्यांचा दुरुपयोग झालाच तर तो कसा होईल, या संकुचित प्रश्नाकडेच लक्ष केंद्रित करून सर्वोच्च न्यायालयाने रोख्यांच्या योजनेला जो एक विशाल, व्यापक संदर्भ आहे तो दुर्लक्षितच केला. त्यामुळेच या निर्णयामुळे केवळ प्रगतीलाच खीळ बसेल असे नव्हे, तर भारतीय राजकारणाला वर्षानुवर्षे ग्रासणाऱ्या अपारदर्शक, रोकड रकमांच्या व्यवहारांना त्यातून प्रोत्साहनच दिल्यासारखे होईल.विरोध केवळ निवडणूक रोख्यांनाच झाला आहे असे नाही... याआधीही काही सुधारणांना अशा नकारात्मकतेचा सामना करावा लागलेलाच आहे. उदाहरणार्थ (सध्याच्या न्यायवृंदाऐवजी) 'राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग' स्थापण्याची सुधारणा. रोखे काय आणि न्यायिक नियुक्ती आयोग काय, दोन्हीला विरोध करण्यासाठी विविध संशयांची खुसपटे काढत राहण्याचे, शिवाय न्यायालयीन खटलेबाजीचेही काम काहींनी केले. पण वास्तविक या दोन्ही पुढाकारांमागे एक समान ध्येय आहे : लोकशाहीमध्ये कळीच्या ठरणाऱ्या प्रक्रियांना अधिक पारदर्शक, अधिक उत्तरदायी बनवण्याचे ध्येय. या सुधारणांचा स्वीकार करण्याऐवजी नकारघंटा वाजवणाऱ्या प्रवृत्तींना जणू 'निवडक' पारदर्शकता हवी आहे, बदल तर हवा पण तो इतरांच्यात व्हावा आणि स्वत:मध्ये नको अशी ही प्रवृत्ती आहे.

## संपादकीय »

### लडाखही लटकले

*केंद्राच्या आश्वासनांचा एव्हाना पुरेपूर अनुभव आलेल्या लेह- लडाख- कारगिलवासीयांनी ३ फेब्रुवारीचा नियोजित बंद कडकडीतपणे आणि उत्स्फूर्तपणे पाळला.*

राजधानी दिल्लीत शेतकरी आंदोलन, भाजपचे पुढील हजार वर्षांच्या रामराज्याचा एल्गार करणारे अधिवेशन इत्यादींच्या धबडग्यात सोमवारी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत काय झाले याचा पूर्ण तपशील अद्याप उपलब्ध नाही. तसा तो नसला तरी ज्या विषयावर ही बैठक केंद्रास बोलवावी लागली तो मुद्दा महत्त्वाचा आहे. याचे कारण गेले काही महिने त्या भागात जे काही सुरू आहे त्याकडे जवळपास संपूर्ण देशाचे दुर्लक्ष झालेले आहे. देशाच्या सीमावर्ती भागांतील खदखदीकडे सतत काणाडोळा करणे हे तसे आपले वैशिष्ट्यच.या परिसरांतील अस्वस्थतेची दखल मध्यवर्ती माध्यमे पुरेशा प्रमाणात घेत नाहीत आणि त्यामुळे या परिसरांतील अस्थैर्याचे वास्तव नागरिकांस उमजू शकत नाही. त्यास ना वाहिन्यांनी प्रसिद्धी दिली ना महत्त्वाच्या वर्तमानपत्रांच्या प्रथम पृष्ठांवर त्यास स्थान मिळाले.

अजितदादांसारखा स्पष्टवादी राजकारणी राज्यात शोधूनही सापडणार नाही. काय वक्तव्ये असतात त्यांची एकेक. परवाचेच बघा ना! 'संसदेत भाषणे करून, सेल्फी काढून, संसदरत्न पुरस्कार मिळवून मतदारसंघातील कामे होत नाहीत. मी मतदारसंघात न येता मुंबईत बसून उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार मिळवला असता तर कामे झाली असती का?'

# दादांसारखा राजकारणी सापडणार नाही



याचा मथितार्थ हाच की नुसती भाषणे नको, कामे करा. आता यावरून कुणी असा निष्कर्ष काढला की दादांना काका व ताईंसारखी भाषणे करता येत नाहीत, या असूयेतून ते बोलले तर त्यांच्यासारखा पढतमूर्ख या जगात नाही. आमदार किंवा खासदार होणे याचा अर्थ एकच तो म्हणजे विकासकामे मार्गी लावणे. आता कामे करायची म्हटली की कंत्राटे आलीच, ती 'घेणारे' व त्यातून 'देणारे' लोक आले असा तर्क लावणे सुद्धा दादांवर अन्याय करणारे. कितीही आरोप होवोत पण दादा 'त्यातले' नाहीत. म्हणूनच तर आधी आरोप करणाऱ्या नागपूरच्या भाऊंनी त्यांना शेजारी बसवून 'पवित्र' केले.लोकप्रतिनिधी केवळ त्यांच्या मतदारसंघापुरते मर्यादित नसतात. त्यांनी त्यापलीकडे जात राज्य व देशातील लोकांचे प्रश्न मांडायला हवेत, त्यासाठी भाषणे करायला हवीत ही संकल्पनाच चुकीची. अशी तोंडाने वाफ दवडल्याने लोक मत देतात हे दादांना अमान्य. काम दाखवा व मत मिळवा हा त्यांचा सरळ 'हिशेब'. अशा कामांमुळे सरकारी पैसा 'वाहता' राहतो. त्याचा लाभ अनेकांना होतो. हे वास्तव नाकारून दादा केवळ कंत्राटदारांच्या भल्यासाठी बोलताहेत असा अर्थ काढणे चुकीचेच. गेली अनेक वर्षे बारामतीचे काका व ताई देशभर नुसती भाषणे ठोकत हिंडत होते तेव्हा दादा याच भागात शेकडो 'कामे' करण्यात व्यग्र होते. नेमकी हीच बाब दादांना सांगायची होती. कामवाला हवा भाषणवाले नकोत. त्यामुळेच तर दादा 'उत्कृष्ट संसदपटू' वगैरे पुरस्काराच्या भानगडीत कधी पडले नाहीत. भाषणांमुळे लोक भावनिक होतात पण त्याने भाकरीचा प्रश्न सुटत नाही हे दादांचे महत्त्वाचे वाक्य. यातली भाकरी नेमकी कुणाच्या ताटात? दादा, त्यांचे 'कामवाले' मित्र की सामान्य लोक? असले कुजके प्रश्न उपस्थित करून दादांच्या 'काम'निष्ठेवर शंका घेण्याची काही गरज नाही. आणि हो, हे वाक्य केवळ काका व ताईसाठी होते, विश्वगुरूंसाठी नाही.दादा नेहमी असेच काहीतरी बोलतात व नंतर माघार घेत प्रायश्चित्ताचे नाटक करतात असा निष्कर्ष तर अजिबात नको. ते धरणात पाणी भरणे असो वा पीएच.डी.संदर्भातले. या दोन्ही वक्तव्यांमागे 'काम काय, फायदा काय' अशीच प्रेरणा होती. त्याने लोक दुखावले म्हणून दादा नरमले पण आता घरचेच दुखावल्याने ते माघार घेण्याची शक्यता नाही. लोकांच्या कामाचे ओझे ते भविष्यातही सहन करतील पण घरच्यांचे ओझे त्यांनी नुकतेच खांद्यावरून उतरवलेले. त्यामुळे आता त्यांचे दोन्ही खांदे कामांचे ओझे वाहण्यासाठी सज्ज झालेले म्हणून ते इतके स्पष्ट बोलले. काम, कंत्राटदार व सरकार हीच आता दादांच्या कार्याची त्रिसूत्री.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा आरक्षण विधेयक मंजूर!

## मराठा आरक्षण कोर्टात टिकणारच : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षण विधेयक आज विधीमंडळाच्या पटलावर ठेवलं. मुख्यमंत्र्यांनी मांडलेलं मराठा आरक्षण विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर झालं. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या आरक्षण विधेयकाला आमचा कुणाचाही विरोध नाही, त्यामुळे याला बहुमत म्हणा किंवा एकमत म्हणा, असं विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मराठा आरक्षण विधेयक हे बहुमताऐवजी एकमताने मंजूर होत आहे, असं जाहीर केलं.**



ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता, मराठा समाजाला कायद्यात टिकणारं आरक्षण आम्ही देत आहोत, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्य सरकारनेआज मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावलं. यामध्ये मागासवर्ग आयोगाने केलेल्या सर्वेक्षणानंतर सादर केलेला अहवाल राज्य सरकारने स्वीकारला. त्याला मंत्रिमंडळ मंजुरी मिळाल्यानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षण विधेयक विधीमंडळात मांडलं. मराठा समाजाचं आरक्षण कोर्टात टिकणारच. राज्य सरकारने घेतलेला निर्णय मोठा आणि धाडसी निर्णय आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. विरोधी पक्षनेते यांनी मला याबाबतीत मला मुद्दे आणि पत्र दिले आहे. त्यामुळे या संदर्भात मी स्पष्टीकरण देत आहे. कालच शिवाजी महाराज यांची जयंती आपण साजरी केली. शिवाजी महाराज यांच्यापुढे नतमस्तक होऊन आरक्षण देण्याची शपथ घेतली होती. हे सर्व महाराष्ट्राने पाहिलं आहे. मला मराठा समाजाच्या वेदनांची माहिती आहे. मी राज्याचा मुख्यमंत्री आहे, त्यामुळे एका जाती धर्माचा विचार करता येणार नाही. त्यामुळे इतर समजासाठी ही तीच भावना आहे. सब का साथ सबका विकास हे ब्रीद वाक्य मोदी साहेब यांनी दिलं आहे. एकाची बाजू घेण्याच माझ्याकडून होणार नाही. कोणतयाही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची जबाबदारी आहे. आपण सर्वजण एकाच मताचे आहोत. नोकरी आणि शैशैक्षणिक आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. आजचा दिवस कर्तव्याची जाणीव करुन देणारा आहे. ना कोणावर अन्याय, ना कोणाला धक्का असा निर्णय घेत आहे. मुख्यमंत्री असलो तरी आंदोलकांना भेटलो. तुमच्यापेक्षा जनता मोठी आहे. यामुळे त्यांना पहिलं भेटा असं बाळासाहेब म्हणाले होते. एकनाथ शिंदे यांनी वेळ मारुन नेतील असं काही जण म्हणाले. मात्र शब्द देताना शंभरवेळा विचार करतो. तो मी पाळतो,या वर मला राजकीय बोलायचं नाही, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. काही घटना घडल्या, त्या घडायला नको होत्या. ही आंदोलनं राज्याच्या विकासाला न परवडणारी आहेत. अनेकांना वाटतं की चुटकीप्रमाणे निर्णय झाला पाहिजे. आचारसंहिता लागेल मग कसं होणार या संदर्भात माझ्यावर काही आरोप ही झाले. दीडशे दिवस हे अहोरात्र काम सुरु होतं. तीन ते चार लाख लोक काम करत होते, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. हा कायदा कोर्टात टिकेल याची खात्री बाळगा. आपण काहीही बेकायदेशीर करत नाही. आपण सर्व कायदेशीर करतो. 22 राज्यात 50 टक्के पेक्षा जास्त आरक्षण आहे.

### अध्यादेशावर सहा लाख हरकती

» 50 टक्के आरक्षण मर्यादा आपण ओलंडली. सुप्रीम कोर्टाने आपल्याला अधिकार दिलाय. हा कायदा टिकेल. या आंदोलनात काही मृत्यूही झाले. त्यांच्यासंदर्भात संवेदना व्यक्त करतो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. सुप्रीम कोर्टाने ज्या त्रुटी काढल्या त्या पूर्ण करण्याचं काम करत आहे. आरक्षण टिकून रहावं यासाठी राज्य सरकार सर्व ताकद लावणार आहे. विरोधी पक्षांनाही सोबत ठेवणार आहे. कुणबी दाखला संदर्भात ही समिती काम करत आहे. सहा लाख हरकती आलेल्या आहेत. यावर प्रक्रिया सुरु आहे. जी अधिसूचना काढली आहे त्यावर हरकती आल्या आहेत. त्यावर छाननी सुरू आहे. त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. १९६७ पूर्वी नोंदी आहे, त्यांना आरक्षण दिलं जाईल. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण दिले जाईल, असे एकनाथ शिंदे म्हणाले. शिवरायांची शपथ घेतल्यानंतर तीन महिन्यांत मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला आहे. हा सॅम्पल सर्व्हे नाही तर डिप सर्व्हे आहे. अडीच कोटी लोकांचा सर्व्हे करण्यात आला आहे. सरकार कोणताही दुजाभाव करणार नाही. घाईगडबड करणं योग्य नाही. त्यामुळे योग्य निर्णय घेत आहे. सरकार जे बोलतं ते करतं हे आंदोलनंकर्त्यांनी समजून घेतलं पाहिजे. एकमताने हे विधेयक मंजूर करावं अशी विनंती करत आहे. टिकणारं हे विधेयक आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. कायद्याच्या चौकटीत आणि टिकणारं आरक्षण देत आहे. मागे काय झालं हे बोलत नाही.

# लोहगड ते आलेवाडी 180 किमी पायी शिवज्योत प्रवास!

## पद्मावती मित्र मंडळाच्या वतीने शिवजयंती अपूर्व उत्साहात साजरी

। मेढा ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिनांक 19 फेब्रुवारी 1630 साली छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. शिवरायांच्या पराक्रमाची आठवण तसेच त्यांच्या विचारांमुळे प्रेरित होऊन गेली अनेक वर्ष महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील बऱ्याच गावात महाराष्ट्रातील गडावरून ज्योत आणली जाते. तसेच जावली तालुक्यातील अनेक गावांमधून शिवजयंती साजरी केली जाते.**





गडावरून ज्योत पायी गावोत आणली जाते. त्यापैकी एक जावली खोऱ्यातील आलेवाडी या गावातील पद्मावती मित्र मंडळ भगतवाडी येथील हरहुन्नरी तरुणांनी आलेवाडी पासून जवळ जवळ 180 किमी अंतरावर असलेल्या पुणे जिल्ह्यातील लोहगड किल्यावरील महादेव मंदिरातून ज्योत पूजन करून पायी प्रवास करत आलेवाडी या गावातील भगतवाडी येथे ज्योत आणली व त्यानंतर शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

### लहानग्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

» आलेवाडी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच महाप्रसादाचे आयोजन महिलांचा हळदी कुंकू व रांगोळी स्पर्धा कार्यक्रम तसेच लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशा पद्धतीने शिवजयंतीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# 40 आमदार भाजपच्या वाटेवर?

## भाजपचं निवडणुकीत 370 जागा जिंकण्याचं उद्धिष्ठ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहे. दोन आठवड्यात निवडणूक आयोगाकडून सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा होऊ शकते. त्यामुळे देशातील सर्वच पक्षानं जोरदार तयारी सुरु केली आहे. भाजपनं (BJP) या लोकसभा निवडणुकीत 370 जागा जिंकण्याचं उद्धिष्ठ ठेवलेय. त्यासाठी इतर पक्षांच्या निवडक नेत्यांसाठी पक्षाची दारं खुली ठेवली आहेत.**



नुकताच महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला. चंदीगढमध्ये तीन नगरसेवकांनी विनोद तावडेंच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. तर राजस्थानमध्ये काँग्रेस आमदार महेंदरजीत मालवीय यांनीही भाजपचं कमळ हातात घेतलं. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ आणि त्यांचा खासदार मुलगाही भाजपच्या वाटेवर असल्याच्या वावड्या उडत आहेत. भविष्यात काँग्रेसचं आणखी नेते भाजपात जाऊ शकतात, असा अंदाज वर्तवला जातोय. महाराष्ट्रातही काही काँग्रेस नेते भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. नितेश राणे आणि सुजय विखे पाटील यांनी राज्यातील काही काँग्रेस नेते भाजपच्या वाटेवर असल्याचे सूचक वक्तव्य केले होते. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील काँग्रेसचे तब्बल 12 खासदार, 40 आमदार आणि इतर महत्वाचे नेते भाजपच्या वाटेवर आहेत. पुढील दोन आठवड्यात त्यांचा भाजपात प्रवेश होऊ शकतो.काँग्रेसधील 12 खासदार, 40 आमदारांसह काही बडे नेते भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय इतर पक्षामधीलही काही नेते भाजपच्या संपर्कात आहेत. पुढील दोन ते तीन आठवड्यात भाजपात मोठं इनकमिंग होण्याची शक्यता आहे. त्यासाठी नेत्यांच्या प्रवेशाची तपासणी करण्यासाठी भाजपकडून चार नेत्यांची समिती स्थापन केली आहे. विनोद तावडे, केंद्रीय मंत्री बूपिंदर यादव, आसामचे मुख्यमंत्री हेमंता बिस्वा आण बीएल संतोष या चार जणांची समिती भाजपात होणाऱ्या इनकिंमवर काम करत आहेत. चार जणांची समितीचं लक्ष भाजपचं वर्चस्व असणाऱ्या चार राज्यात असेल,जिथं भाजपचं मोठं अस्तित्व आहे तरीही जागा जिंकू शकत नाहीत, त्या जागा जिंकण्यासाठी भाजपनं रणनिती आखली आहे. भाजपची चार जणांची समिती काही खास राज्यावर लक्ष ठेवून आहे. महाराष्ट्र, आसाम, उत्तर प्रदेश, जम्मू काश्मिर, मध्य प्रदेशमधील जास्तीत जास्त जागांवर भाजपचं लक्ष आहे. येथे भाजपला जास्त जागा जिंकायच्या आहेत. 2019 मध्ये जिंकलेल्या जागाव्यतिरिक्त 25 पेक्षा जास्त जागा भाजपला या राज्यातून हव्या आहेत. त्यासाठी भाजपनं शर्थीचे प्रयत्न सुरु केले आहे. इतर पक्षातील मतब्बर आणि दिग्गज नेते भाजपात आले तर पंजाब, पश्चिम बंगाल, ओडिशा, कर्नाटक, झारखंड आणि इतर काही राज्यात भाजपाच्या लोकसभेच्या दहा जागा वाढू शकतात, असा अंदाज समितीचा आहे. चार जणांच्या समितीचं पंजाब, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशवर लक्ष असल्याचं समजतेय. उर्वरित दक्षिणेकडील राज्यात भाजपनं 10 पेक्षा जास्त जागा जिंकण्याचं लक्ष ठेवल्याचं समोर आले आहे. पुढील दोन ते तीन आठवड्यात देशभरात भाजपमध्ये मोठं इनकमिंग होऊ शकतं, असा अंदाज आहे. लोकसभेच्या पार्श्वभूमीवर भाजपनं मेगाप्लॅन तयार केला आहे. काँग्रेसचे 12 पेक्षा जास्त खासदार भाजपच्या वाटेवर असल्याचं समजतेय. त्याशिवाय 40 पेक्षा जास्त आमदार आणि मातब्बर नेतेही भाजपात प्रवेश करु शकतात. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील काँग्रेसचे तब्बल 12 खासदार, 40 आमदार आणि इतर महत्वाचे नेते भाजपच्या वाटेवर आहेत. पुढील दोन आठवड्यात त्यांचा भाजपात प्रवेश होऊ शकतो.काँग्रेसधील 12 खासदार, 40 आमदारांसह काही बडे नेते भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय इतर पक्षामधीलही काही नेते भाजपच्या संपर्कात आहेत. पुढील दोन ते तीन आठवड्यात भाजपात मोठं इनकमिंग होण्याची शक्यता आहे. त्यासाठी नेत्यांच्या प्रवेशाची तपासणी करण्यासाठी भाजपकडून चार नेत्यांची समिती स्थापन केली आहे.

### निवडक नेत्यांसाठी पक्षाची दारं खुली

» विनोद तावडे, केंद्रीय मंत्री बूपिंदर यादव, आसामचे मुख्यमंत्री हेमंता बिस्वा आण बीएल संतोष या चार जणांची समिती भाजपात होणाऱ्या इनकिंमवर काम करत आहेत. चार जणांची समितीचं लक्ष भाजपचं वर्चस्व असणाऱ्या चार राज्यात असेल,जिथं भाजपचं मोठं अस्तित्व आहे तरीही जागा जिंकू शकत नाहीत, त्या जागा जिंकण्यासाठी भाजपनं रणनिती आखली आहे. लोकसभा निवडणुकाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहे. दोन आठवड्यात निवडणूक आयोगाकडून सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा होऊ शकते. त्यामुळे देशातील सर्वच पक्षानं जोरदार तयारी सुरु केली आहे. भाजपनं (BJP) या लोकसभा निवडणुकीत 370 जागा जिंकण्याचं उद्धिष्ठ ठेवलेय. त्यासाठी इतर पक्षांच्या निवडक नेत्यांसाठी पक्षाची दारं खुली ठेवली आहेत. नुकताच महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केला. चंदीगढमध्ये तीन नगरसेवकांनी विनोद तावडेंच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. तर राजस्थानमध्ये काँग्रेस आमदार महेंदरजीत मालवीय यांनीही भाजपचं कमळ हातात घेतलं. जागा जिंकण्यासाठी भाजपनं रणनिती आखली आहे. भाजपची चार जणांची समिती काही खास राज्यावर लक्ष ठेवून आहे.

# अन्नदात्या शेतकऱ्यांचा आवाज ठाकरे बुलंद करणार!

## उद्धव ठाकरे शंभू बॉर्डरवर शेतकऱ्यांना भेट देण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**किमान आधारभूत किंमतीसाठी शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. सर्व 23 पिकांच्या किमान आधारभूत किमतीवर खरेदीची हमी आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी हा मागण्यांमधील प्रमुख कळीचा मुद्दा आहे. शेतकरी दिल्लीत येऊ नये, यासाठी मोदी सरकारकडून रस्त्यात खिळं मोळं, क्रॅांक्रिट टाकून महामार्ग बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे देशात संतापाची लाट आहे.**

दिल्लीच्या सीमांवर रस्त्यांवर एल्गार पुकारलेल्या शेतकऱ्यांची शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे भेट घेण्याची शक्यता आहे. हरियाणा-पंजाबमधील शंभू बॉर्डरवर शेतकऱ्यांची उद्धव ठाकरे भेट घेण्याची शक्यता आहे. शिवसेना खासदार संजय राऊत यांच्याकडून यासाठी मार्ग तसेच अंतर पाहणी करण्यात आली आहे. दरम्यान, शेतकरी आंदोलनाचा आज सातवा दिवस आहे. विविध मागण्यांबाबत शेतकरी आणि सरकार यांच्यातील चर्चेची चौथी फेरीही निष्फळ ठरली आहे. चंदीगडमध्ये रविवारी रात्री शेतकरी नेते आणि केंद्र यांच्यात



सुरू झालेली चर्चेची चौथी फेरी एमएसपी आणि कर्जमाफीच्या मुद्द्यावर अडकली. चर्चेच्या चौथ्या फेरीत केंद्रीय कृषी मंत्री अर्जुन मुंडा, पीयूष गोयल आणि नित्यानंद राय यांनी समिती स्थापन करण्याबाबत बोलले, परंतु शेतकरी संघटना समिती स्थापन करण्याच्या बाजूने दिसल्या नाहीत. मात्र, केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी शेतकरी प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीचे वर्णन सकारात्मक असल्याचे सांगितले. असे ते म्हणाले. सरकारशी चर्चेच्या चार फेऱ्यांनंतरही दिल्लीला लागून असलेल्या इतर राज्यांच्या सीमेवर शेतकरी उभे आहेत. पंजाब किसान मजदूर संघर्ष समितीचे सरचिटणीस सर्वन सिंह पंढेर यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांचा 'दिल्ली चलो' मोर्चा सुरूच राहणार आहे.

### शेतकऱ्यांचे पुढचे पाऊल काय असेल?

» केंद्रीय मंत्री पियुष गोयल म्हणाले की, शेतकरी प्रतिनिधींसोबतची त्यांची बैठक सकारात्मक होती. सरकारने मांडलेल्या प्रस्तावावर लवकरच शेतकरी आपला निर्णय घेतील. नॅशनल कोऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन आणि नॅशनल ॲग्रिकल्चरल कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांसारख्या सरकार समर्थित सहकारी संस्था पुढील 5 वर्षांसाठी शेतकऱ्यांसोबत करार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. एमएसपीवर उत्पादने खरेदी करणार, प्रमाणावर मर्यादा नसल्याचं ते म्हणाले.सरकार आणि शेतकरी नेत्यांमध्ये आतापर्यंत चर्चेच्या चार फेऱ्या झाल्या आहेत. पहिली बैठक 8 तारखेला, दुसरी बैठक 12 तारखेला आणि तिसरी बैठक 15 फेब्रुवारीला झाली.

# 'डॉन'ची जंगली बील्ली प्रियांका चोप्रा या तिसऱ्या भागात दिसणार?

फरहान अख्तरने 'डॉन ३'ची घोषणा केल्यानंतर सगळेच फार उत्सुक झाले होते. चाहत्यांची ही उत्सुकता मात्र एका क्षणात रागात बदलली जेव्हा या तिसऱ्या भागात मुख्य भूमिकेसाठी रणवीर सिंहला घेतल्याचं स्पष्ट झालं. प्रेक्षकांना या भूमिकेसाठी रणवीरची निवड अजिबात पटलेली नसून त्यांनी यावर टीकादेखील केली. यानंतर 'डॉन ३'मध्ये रणवीरच्या बरोबरीने कोणती अभिनेत्री झळकणार याची चर्चा रंगू लागली. बऱ्याच अभिनेत्रींची नावं समोर आली होती.'डॉन'ची जंगली बील्ली म्हणजेच प्रियांका चोप्रा या तिसऱ्या भागात दिसणार अशीही चर्चा होती. आता या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. 'डॉन ३'बद्दल नवीन अपडेट समोर आली आहे. खुद्द फरहान अख्तरने खास व्हिडीओ शेअर करत या चित्रपटात रणवीरसह झळकणाऱ्या अभिनेत्रीचा खुलासा केला आहे.'डॉन ३'मध्ये रणवीरच्या



बरोबरीनेच अभिनेत्री कियारा अडवाणी झळकणार आहे. नुकतंच 'डॉन युनिव्हर्स'मध्ये कियाराची एंट्री झाल्याची अधिकृत घोषणा फरहानने एका व्हिडीओच्या माध्यमातून केली आहे. "डॉन युनिव्हर्समध्ये कियारा अडवाणीचं स्वागत आहे, एका नव्या पर्वाची सुरुवात होत आहे." असं लिहून व्हिडीओ शेअर करत फरहानने ही घोषणा केली आहे. सोशल मीडियावर यावरुन जबरदस्त चर्चा होत आहे.प्रेक्षक या धमाकेदार ब्लॉकबस्टर जोडीला एकत्र स्क्रीनवर पाहण्यासाठी फारच उत्सुक असल्याचं त्यांनी कॉमेंट करत लिहिलं आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून रणवीर आणि कियारा प्रथमच स्क्रीन शेअर करणार आहेत. प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट बघत आहेत. हा नव्या पिढीचा डॉन असल्याने यामध्ये शाहरुख ऐवजी नवा तरुण चेहरा घेतल्याचं मध्यंतरी फरहानने स्पष्ट केलं होतं.

## महेश भट्ट यांनी दिला मोलाचा सल्ला

हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते म्हणून मनोज बाजयेपींना ओळखले जाते. आपल्या दर्जेदार अभिनयाने मनोज यांनी प्रेक्षकांच्या मनावर छाप सोडली आहे. अनेक सुरपहिट चित्रपटांमध्ये मनोज बाजपेयींनी काम केले आहे. तसेच सध्या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही मनोज यांची चलती आहे. पण तुम्हाला माहितीये का मुंबईत अभिनेता बनण्याचं स्वप्न घेऊन आलेल्या मनोज बाजपेयी यांच्या आयुष्यातही एक वेळ आली होती जेव्हा त्यांनी हे शहर सोडून जायचा निर्णय घेतला होता.त्यावेळी मनोज यांना हवे तसे कामही मिळत नव्हते अन् त्यांनी 'स्वाभिमान' या टीव्ही सिरियलमध्ये काम करायचा निर्णय घेतला होता. मनोज यांची मालिकांमध्ये काम करायची अजिबात इच्छा नव्हती, तेव्हा त्या मालिकेचे निर्माते व प्रसिद्ध दिग्दर्शक महेश भट्ट यांनी मनोज बाजपेयी यांनी एक मोलाचा सल्ला दिला होता. त्यावेळी त्यांनी मनोज यांच्यातील क्षमता ओळखली होती.'चलचित्र टॉक्स' या पॉडकास्ट शोमध्ये मनोज बाजपेयी यांनी हजेरी लावली त्यादरम्यानच मनोज यांनी या गोष्टीचा खुलासा केला. मनोज म्हणाले, "मी नाटक करूनही मला म्हणावं तसं काम मिळत नव्हतं, जी लोक माझं कौतुक करायचे त्यांनीही आता माझ्यावर शंका घ्यायला सुरुवात केली होती.

## प्रार्थना बेहेरेने मागितली माफी



राज्यभरात आज शिवजयंतीचा जल्लोष पाहायला मिळत आहे. शिवजयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लातूरमधील एका कार्यक्रमात अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. त्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.लातूरच्या उदगीर येथील एका मॉलच्या उद्घाटनासाठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी उद्घाटनादरम्यान शुभेच्छा देताना सलग चार-पाचवेळा तिने महाराजांचा एकेरी शब्दात उल्लेख केला. त्यामुळे लातूरमधील शिवभक्तांकडून तिचा निषेध करण्यात येत आहे. तसेच अभिनेत्रीच्या स्वागतासाठी लावण्यात आलेले बॅनरदेखील फाडण्यात आले आहेत. तसेच प्रार्थनाने आता माफी मागावी, अशी मागणी शिवप्रेमींकडून करण्यात येत आहे.मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री प्रार्थना बेहेरे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे एका व्यापारी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमासाठी आली होती. यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. अभिनेत्रीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. संतप्त झालेल्या शिवप्रेमींनी उदगीर शहरामध्ये अभिनेत्रीचे लागलेले बॅनर फाडत संताप व्यक्त केला. अभिनेत्रीच्या ही बाब लक्षात आल्यानंतर तिने नवा व्हिडीओ बनवून शिवप्रेमींची माफी मागितली आहे.प्रार्थना बेहेरेने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवभक्तांनी नाराजी दर्शवत तिच्या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदवला. अभिनेत्रीने जाहीर माफी मागावी अशी मागणी केली जात होती. अशातच आता अभिनेत्रीने एक व्हिडीओ शेअर करत जाहीर माफी मागितली आहे. प्रार्थना बेहेरे म्हणाली आहे,"आज मी उदगीर येथे किसान मॉलच्या उद्घाटनाला आले होते. तिथे आल्यावर माझ्याकडून चुकून काही बोलण्यात आले असेल तर त्या बद्दल मी तुम्हा सर्वांची माफी मागू इच्छिते. कृपा करून मला माफ करा, माझा त्या बोलण्याचा उद्देश चुकीचा नव्हता. मी परत म्हणते की छत्रपती शिवाजी महाराजांच्या

## मेस्सीने कुटुंबियांबद्दल केला मोठा खुलासा

बॉलिवूड अभिनेता विक्रांत मेस्सी सध्या त्याच्या '12TH FAIL' चित्रपटामुळे चर्चेत आहे. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. या चित्रपटाला यंदाचे बरेच फिल्मफेअर पुरस्कारही मिळाले. सामान्य प्रेक्षकांपासून बऱ्याच सेलिब्रिटीजपर्यंत कित्येकांनी विक्रांतच्या अभिनयाचे आणि त्याच्या या चित्रपटाचे कौतुकही केले. चित्रपटक्षेत्रात येण्याआधी विक्रांतने बऱ्याच टीव्ही सिरियल्समध्ये काम केलं ज्यातून त्याला लोकप्रियता मिळाली.नुकतंच एका मुलाखतीदरम्यान विक्रांतने त्याच्या या प्रवासाबद्दल भाष्य केलं आहे. या यूट्यूब पॉडकास्टमध्ये विक्रांतने हजेरी लावली अन् मनमोकळ्या गप्पा मारल्या. लहानपणापासूनच घरात विक्रांतने धर्म आणि अध्यात्म याबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकल्या आहेत. यावरुन निर्माण होणारे तणाव आणि वाद याबद्दलही विक्रांतने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर आपल्या भावाने इस्लाम धर्म स्वीकाराला असल्याचंही त्याने स्पष्ट केलं. आपल्या मोठ्या भावाबद्दल बोलताना विक्रांत म्हणाला, "माझ्या भावाचं नाव मोईन आहे अन् माझं विक्रांत. तुम्हाला माझ्या भावाचं नाव ऐकून आश्चर्य वाटलं असेल. त्याने इस्लाम धर्म स्वीकारला आहे अन् माझ्या कुटुंबाच्या परवानगीनेच त्याने धर्मपरिवर्तन केले आहे. माझ्या घरच्यांनी याबाबतीत कधीच आडकाठी केली नाही. त्याने वयाच्या १७ व्या वर्षी इस्लाम धर्म स्वीकारला. माझी आई शीख आहे तर माझे वडील हे नित्यनेमाने चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करणारे ख्रिश्चन आहेत. ते आठवड्यातून दोनवेळा चर्चमध्ये जातात. लहानपणापासूनच मी धर्म या गोष्टीवरुन होणारे वाद मी फार जवळून पाहिले आहेत."विक्रांत पुढे म्हणाला, "माझे नातेवाईक माझ्या वडिलांना विचारायचे की तुम्ही तुमच्या मुलाला धर्म बदलूच कसा दिला. त्यावर माझे वडील त्यांना चोख उत्तर द्यायचे. ते सांगायचे, तो माझा मुलगा आहे आणि तो केवळ मला उत्तर द्यायला बांधील आहे अन् त्याला त्याच्या आयुष्यात कोणताही निर्णय घ्यायचं स्वातंत्र्य आहे. यामुळेच माझ्या विचारांमध्येही बराच फरक पडला, माझ्यामते धर्म हा मानवनिर्मितच आहे."

## हृतिकच्या 'फायटर'चा बॉक्स ऑफिसवर धमाका



'फायटर' या सिनेमाने 2024 ची दमदार सुरुवात केली आहे. भारतीय बॉक्स ऑफिसवर या सिनेमाने दणदणीत कमाई केली आहे. 'फायटर' हा सिनेमा 25 जानेवारी 2024 रोजी प्रदर्शित झाला आहे. आतापर्यंत या सिनेमाने 350 कोटींची कमाई केली आहे.'फायटर' हा सिनेमा रिलीजच्या पहिल्या दिवसापासूनच शानदार कमाई करत आहे. जगभरातील बॉक्स ऑफिसवर या सिनेमाने 350 कोटींपेक्षा अधिक कमाई केली आहे. 350 कोटींच्या क्लबमध्ये सामील होणारा हा या वर्षातला पहिला सिनेमा आहे. सिद्धार्थ आनंदच्या 'फायटर'चा भारतीय बॉक्स ऑफिसवर दबदबा कायम आहे. रिलीजच्या 25 दिवसांनंतरही हा सिनेमा कोट्यवधींची कमाई करत आहे. 'फायटर' या सिनेमात दीपिका पादुकोण, अनिल कपूर आणि करण सिंह ग्रोवर हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. फायटर' या सिनेमात हृतिक रोशन आणि दीपिका पादुकोण मुख्य भूमिकेत आहेत. तसेच अनिल कपूर, करण सिंह ग्रोवर, अक्षय ओबेरॉय, संजीदा शेख, तलत अजीज, संजीव जयसवाल, ऋषभ साहनी आणि आशुषोष राणा हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. सिद्धार्थ आनंदेया सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे.हृतिक रोशनच्या 'वॉर' आणि 'बँग बँग' या सिनेमांनी आतापर्यंत ओपनिंग डेला सर्वाधिक कमाई केली आहे.

# बुमराह चौथ्या सामन्यात संघाबाहेर!

## पाच कसोटी सामन्याच्या मालिकेत भारताने 2-1 ने आघाडी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**जसप्रीत बुमराह सध्याच्या घडीला चांगल्या फॉर्मात आहे. दुसऱ्या सामन्यात तर बुमराह हा सामनावीर ठरला होता. तिसऱ्या सामन्यातही बुमराने भारताला चांगली सुरुवात करून दिली होती. पण आता चौथ्या कसोटी सामन्यात बुमराला संघाबाहेर ठेवणार असल्याचे संकेत मिळत आहेत. पण फॉर्मात असतान बुमराहला संघाबाहेर का ठेवले जाणार आहे, याचे कारणही आता समोर आले आहे.**



या कसोटीत भारतीय संघ वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला विश्रांती देण्याची शक्यता आहे. बुमराहने या मालिकेत आतापर्यंत १७ कसोटी विकेट घेतल्या आहेत. दुसऱ्या कसोटीत तो सामनावीरही ठरला होता. पाचव्या कसोटीपूर्वी बुमराहला विश्रांती देण्याचा संघव्यवस्थापनाचा विचार असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी सांगितले. 'मंगळवारी भारतीय संघ रांचीत दाखल होईल. बुमराह संघासोबत असेल. मात्र, त्याला विश्रांती मिळण्याची शक्यता अधिक आहे,' असे बीसीसीआयच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले. पहिल्या तीन कसोटींत मिळून बुमराहने ८०.५ षटके मारा केला आहे. कामाचा ताण लक्षात घेता संघव्यवस्थापनाने मालिकेतील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात महंमद सिराजलाही विश्रांती दिली होती. अर्थात, एक गट याबाबत सहमत नसल्याचेही सूत्रांनी सांगितले. चौथी कसोटी जिंकून मालिकेत विजयी आघाडी घ्यावी आणि मग पाचव्या कसोटीत बुमराहला विश्रांती द्यावी, असेही काहींचे म्हणणे आहे. पाचवी कसोटी धरमशाला येथे सात मार्चपासून खेळली जाणार आहे. धरमशालाची खेळपट्टी ही वेगवान गोलंदाजांसाठी पोषक ठरू शकते. त्यामुळे बुमराह या सामन्यासाठी ताजातवाना असावा, असे भारतीय संघातील काही जणांना वाटते. जर तो चौथ्या कसोटी खेळला तर तो पाचव्या कसोटीसाठी ताजातवाना होणार नाही. त्यामुळे त्याला चौथ्या कसोटी सामन्यासाठी संघाबाहेर करत पाचव्या लढतीसाठी फिट ठेवण्याचा भारतीय संघ व्यवस्थापनाचा मानस आहे. बुमराहच्या जागी भारताकडे फारसे पर्याय शिल्लक नाहीत. महंमद शमी तंदुरुस्त नसल्याने त्याचा या मालिकेसाठी विचार झालेला नाही. तीय संघाने इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत आतापर्यंत आपला दबदबा राखला आहे. या मालिकेत भारतीय संघ सध्या २-१ने आघाडीवर आहे. तिसऱ्या कसोटीत भारताने इंग्लंडवर विक्रमी विजय मिळवला. आता मालिकेतील चौथी कसोटीला रांची येथे २३ फेब्रुवारीपासून खेळली जाणार आहे. या संघात बदल होण्याची शक्यता आहे. आता बुमराच्या जागी संघात कोणाला संधी द्यायची, हादेखील एक मोठा प्रश्न असेल. त्यामुळे या गोष्टीचा विचार भारतीय संघाला करावा लागणार आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यातील तीन सामने झाले आहेत. इंग्लंडनं (IND VS ENG) पहिल्याच कसोटी मालिकेत विजय मिळवत शानदार सुरुवात केली. पण त्यानंतर रोहितच्या नेतृत्वातील भारतीय संघाने जोरदार पलटवार दिला. विशाखापट्टणम आणि राजकोट कसोटी (RAJKOT TEST) जिंकत भारताने मालिकेत आघाडी घेतली. पाच कसोटी सामन्याच्या मालिकेत भारताने 2-1 ने आघाडी घेतली. राजकोट कसोटी सामन्यात भारताने 434 धावांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. आता 23 फेब्रुवारी रोजी रांची येथे चौथी कसोटी सामना होणार आहे. या कसोटी सामन्यात भारताच्या प्लेईंग 11 मध्ये बदल निश्चित होण्याची शक्यता आहे. जसप्रीत बुमराह याला आराम देण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. त्याशिवाय, रजत पाटीदार याला बेंचवरच बसावं लागू शकतं. भारताचा स्टार फलंदाज केएल राहुल याचं कमबॅक निश्चित आहे. दुखापतीमुळे राहुल राजकोट कसोटीला मुकला होता.युवा रजत पाटीदार यानं विशाखापट्टणम येथील दुसऱ्या कसोटी सामन्यात पदार्पण केले.

### पाटीदारचा पत्ता होणार कट

दोन कसोटीच्या चार डावात त्याला प्रभावी कामगिरी करता आली नाही. पदार्पणाच्या कसोटी सामन्यात रजत पाटीदार यानं पहिल्या डावात 32 आणि दुसऱ्य डावात 9 धावा केल्या. पण राजकोट कसोटी सामन्यात त्याच्याकडून मोठी अपेक्षा होती. पण त्याला अपयश आले. तिसऱ्या कसोटी सामन्यात रजत पाटीदार याला दोन्ही डावात फक्त पाच धावा करता आल्या. पहिल्या डावात पाच आणि दुसऱ्या डावात खातेही उघडता आले नाही. खराब फॉर्ममुळे रजत पाटीदार याला रांची कसोटी सामन्यातून डच्चू मिळण्याची शक्यता आहे. रांची कसोटी सामन्यात भारताच्या प्लेईंग 11 मध्ये बदल निश्चित मानले जात आहे.

# विराट अन् रोहितनेही धावा केल्या नाहीत, तरी मलाच बाहेर काढलं?

## क्रिकेटला अलविदा केल्यानंतर मनोजने मुलाखतीने खळबळ उडवून दिली

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाची कॅप मिळवणे हे देशातील कोणत्याही खेळाडूचे सर्वात मोठे स्वप्न असते. मात्र, वरिष्ठ भारतीय संघाकडून खेळणे जितके कठीण आहे, तितकेच संघातील स्थान टिकवणेही कठीण आहे. अनेक क्रिकेटपटूंनी हे केले आहे आणि दीर्घकाळ संघात स्थान मिळवण्यात यशस्वी ठरले, परंतु काही क्रिकेटपटू आहेत ज्यांनी आंतरराष्ट्रीय मंचावर स्वत:ला सिद्ध केले, परंतु ते जास्त काळ वरिष्ठ भारतीय संघात खेळू शकले नाहीत.**



मनोज तिवारी हा देखील अशा क्रिकेटपटूंपैकी एक आहे, ज्या जवळपास दोन दशके बंगाल क्रिकेटकडून खेळला आणि भारतासाठी 12 एकदिवसीय आणि तीन टी-20 सामने खेळले. रणजी ट्रॉफीमध्ये बंगालच्या अंतिम सामन्याच्या एका दिवसानंतर रविवारी हा खेळाडू निवृत्त झाला. मनोज तिवारीने 2008 मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने 11 डिसेंबर 2011 रोजी चेन्नई येथे वेस्ट इंडिजविरुद्ध पहिले एकदिवसीय शतक झळकावले. त्याच्या या कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. जुलै 2012 मध्ये श्रीलंकेविरुद्ध तो संघाचा भाग नव्हता आणि त्याला प्लेइंग-11 मधून वगळण्यात आले. आता निवृत्तीच्या एका दिवसानंतर मनोजने त्याला संघातून वगळण्याबाबत आणि त्याच्या कारकिर्दीच्या समाप्तीबद्दल एक मोठे विधान केले आहे. तो म्हणाला की, एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करूनही त्याला कसोटी कॅप मिळू शकली नाही याची खंत आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान मनोज म्हणाला की, मी जेव्हा 65 प्रथम श्रेणी सामने खेळलो तेव्हा माझी फलंदाजीची सरासरी 65 च्या आसपास होती. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ भारत दौऱ्यावर आला आणि चेन्नईतील मैत्रीपूर्ण सामन्यात मी 130 धावा केल्या.

### आता गमावण्यासारखे काही नाही

त्यानंतर इंग्लंडविरुद्धच्या मैत्रीपूर्ण सामन्यात मी 93 धावा केल्या. मी कसोटी कॅप मिळवण्याच्या अगदी जवळ होतो, पण त्यांनी माझ्याऐवजी युवराज सिंगची निवड केली. त्यामुळे टेस्ट कॅप मिळू शकली नाही. एवढेच नाही तर एकदिवसीय सामन्यात शतक झळकावल्याबद्दल सामनावीराचा पुरस्कार मिळाल्यानंतर माझ्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.पुढे तो म्हणाला की,तेव्हा एमएस धोनी कर्णधार होता. त्यामुळे मला संधी का मिळली नाही हे महेंद्रसिंग धोनीकडून ऐकायला नक्कीच आवडेल. शतक झळकावल्यानंतर मला संघातून का वगळण्यात आले, ऑस्ट्रेलिया दौऱ्यात जेथे कोणीही धावा काढत नव्हते, ना विराट कोहली, रोहित शर्मा आणि ना सुरेश रैना.... माझ्याकडे आता गमावण्यासारखे काही नाही.